RESEARCH FRONT
Multidisciplinary Peer Reviewed International Journal

ISSN
(Online) 2320 – 6446
(Print) 2320 – 8341

भारतातील डिजिटल पेमेंटचा वापर आणि त्यामध्ये निर्माण होणारे धोके

डॉ. संतोष गुलाबराव यादव

समाजभूषण बाबुराव उर्फ अप्पासाहेब जेधे महाविद्यालय, पुणे- ०२

Email Id – sgyadav29@gmail.com

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.22054347

प्रस्तावना -

अलीकडील काळात बँक व्यवसायाचे स्वरूप मोठ्या प्रमाणावर बदलत आहे. आधुनिक युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जाते. अशा माहिती तंत्रज्ञानाच्या युगात बँक व्यवसायातही मोठ्या प्रमाणावर आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग केला जात आहे. ग्राहकांना त्वरित आणि चांगल्या बँक विषयक सेवा देण्यासाठी बँकिंग क्षेत्रात संगणकाचा वापर केला जात आहे. त्यातच देशातील लोकांना बँक व्यवसायाची सवय मोठ्या प्रमाणावर निर्माण झाल्यामुळे बँकेमार्फत व्यवहार करणाऱ्या लोकांचे प्रमाण वाढत आहे. आधुनिक काळातील स्पर्धात्मक युगात बँकांना टिकून राहण्यासाठी कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त सेवा देण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून केला जात आहे. आधुनिक काळात बँक व्यवसाय हा केवळ एखाद्या विशिष्ट भागापुरता किंवा देशापुरता मर्यादित न राहता तो जागतिक स्वरूपाचा झालेला आहे. त्यामुळे असा बँक व्यवसाय यशस्वी करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर फार वाढला आहे. या तंत्रज्ञानामुळे ग्राहक ते बँक आणि बँक ते बँक अशा प्रकारच्या सुरक्षित बँकिंग सुविधा पुरविल्या जात आहेत. बँकांनी त्यांच्या आधुनिकीकरणात जास्तीत जास्त इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर सुरू केला आहे. त्यातूनच खऱ्या अर्थाने डिजिटल बँकिंग प्रणालीचा उदय झाल्याचे मानले जाते.

संशोधन पद्धती -

प्रस्तुत संशोधन पेपर हा दुय्यम सामग्रीवर आधारित आहे. ही माहिती पुस्तके, मासिके, लेख व इंटरनेट या साधनांद्वारे संकलित करण्यात आली आहे.

संशोधनाचे उद्देश -

1) डिजिटल बँक प्रणालीचा अर्थ समजावून घेणे.
2) भारतातील डिजिटल बँकिंगची स्थिती अभ्यासणे.
3) भारतातील डिजिटल बँक प्रणालीचे फायदे अभ्यासणे.

ISSN
(Online) 2320 – 6446
(Print) 2320 – 8341

4) डिजिटल बँकिंगच्या वापरात निर्माण होणाऱ्या धोक्यांचा अभ्यास करणे.

डिजिटल बँकिंग -





" प्रत्यक्ष बँकेच्या शाखेत न जाता संगणक, लॅपटॉप किंवा मोबाईल फोन यासारख्या साधनांच्या साह्याने इंटरनेटचा वापर करून बँकिंग सेवांचा लाभ घेणे म्हणजे डिजिटल बँकिंग होय."

बँकिंग क्षेत्रात अलीकडील काळात सर्वच स्तरावर अत्यंत जलद गतीने बदल होत आहेत. डिजिटल बँकिंग हे 'इलेक्ट्रॉनिक बँकिंग', 'सायबर बँकिंग', 'होम बँकिंग' किंवा 'आभासी बँकिंग' या नावाने देखील ओळखले जाते. डिजिटल बँकिंगमुळे बँकांच्या पारंपारिक बँक प्रणालीचा वापर कमी होऊन मोबाईल, वायरलेस, इंटरनेट यांच्या माध्यमातून बँकांनी त्यांच्या सेवांची व्याप्ती वाढवली आहे. त्यामुळेच अलीकडील काळात भारतामध्ये डिजिटल बँकिंगच्या वापराचे प्रमाण हे फार मोठ्या प्रमाणावर वाढलेले दिसते.

भारतातील डिजिटल बँकिंगची सुरुवात -

भारतात डिजिटल बँकिंगची सुरुवात 1990 च्या उत्तरार्धात झाल्याचे मानले जाते. भारतात सर्वप्रथम इंटरनेट बँकिंगची सुविधा ICICI या खाजगी बँकेने 1996 मध्ये सुरू केली. धनादेशाचे एनकोडींग करणे ही या क्षेत्रातील डिजिटल परिवर्तनाची खरी सुरुवात मानली जाते. 1990 च्या दशकात इंटरनेटचा वापर वाढू लागला आणि त्यानंतर बँकिंग क्षेत्रात डिजिटलायझेशन झाले. सुरुवातीला भारतात एटीएमचा वापर आणि ऑनलाइन बँकिंग सेवा सुरू झाल्या. इंटरनेट बँकिंगच्या वापरामुळे खात्यात पैसे भरणे, पैसे ट्रान्सफर करणे, आपल्या खात्यातील शिल्लक जाणून घेणे, पासबुक भरण्यासाठी बँकेत न जाता बँकेचे स्टेटमेंट प्राप्त करून घेणे ही कामे घरबसल्या मोबाईल किंवा संगणकाद्वारे करता येऊ लागली. यूपीआय, मोबाईल ॲप आणि इंटरनेट यामुळे हे व्यवहार जलद गतीने सुरक्षितरित्या करता येऊ लागले. 2010 नंतरचा काळ हा डिजिटल बँकेच्या युगातील एक विस्ताराचा कालखंड म्हणून ओळखला जातो. या काळात कोअर बँकिंग सोल्युशन (CBS) मुळे बँकांच्या सर्व शाखा एकमेकांशी जोडल्या गेल्या. त्यामुळे RTGS, NEFT यांचा वापर वाढून पैसे हस्तांतरण वेगवान रित्या होऊ लागले. 2016 नंतर म्हणजेच नोटबंदीच्या निर्णयानंतर UPI (Unified Payments Interface) मुळे डिजिटल पेमेंटच्या क्षेत्रात मोठी क्रांती झाली.

ISSN
(Online) 2320 – 6446
(Print) 2320 – 8341

1990 च्या दशकात भारतात इंटरनेट बँकिंगची संकल्पना नुकतीच रूजू लागली होती. त्यामुळे वापरकर्त्यांचे प्रमाण अगदीच नगण्य होते. या काळात सर्वसामान्य भारतीयांसाठी इंटरनेट बँकिंगचा वापर हा केवळ खात्यातील शिल्लक तपासणे आणि मर्यादित निधी हस्तांतरणासाठी केला जात होता. 1998 मध्ये संपूर्ण भारतात केवळ 1.05 लाख इंटरनेट ग्राहक होते. त्यामानाने बँकिंग व्यवहारासाठी इंटरनेटचा वापर करणाऱ्या लोकांचे प्रमाण अगदीच कमी होते. 2025 अखेरीस भारतातील एकूण इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या 90 कोटींच्या पुढे गेल्याचा अंदाज व्यक्त केला जातो. त्यामुळे डिजिटल बँकिंगचा वापर करणाऱ्यांचे प्रमाणही वाढले आहे. भारतात ऑगस्ट 2025 पर्यंत UPI पेमेंटचा वापर करणारे वैयक्तिक वापरकर्ते 49.1 कोटी तर व्यापारी 6.5 कोटी आहेत. 2025 पर्यंत डिजिटल बँकिंग आणि पेमेंटचा वापर करणाऱ्यांची संख्या 49 कोटी हून अधिक झाली आहे. याच वर्षापर्यंत 'प्रधानमंत्री जनधन योजने' अंतर्गत 45 कोटीहून अधिक बँक खाती उघडली गेली असून ती सर्व खाती मोबाईल बँकिंग ॲपशी जोडली गेलेली आहेत. 2025 पर्यंत भारतात एकूण पेमेंट व्यवहारांपैकी 99.8% व्यवहार हे डिजिटल पद्धतीने झालेले दिसून येतात.

आज भारत हा डिजिटल बँकिंगच्या वापरामध्ये जागतिक स्तरावर आघाडीवर असणारा देश मानला जातो. भारतात बँकिंग क्षेत्रात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढल्यामुळे बँक शाखांमध्ये जाण्याची गरज लोकांना भासत नाही. त्यामुळे बँक शाखांमधील गर्दी कमी होत असून पेपरलेस आणि कॅशलेस व्यवहारांना फार मोठी गती प्राप्त झाली आहे. भारतात डिजिटल बँकिंगचे जाळे वेगाने पसरत असून ते आर्थिक साक्षरतेसाठी महत्त्वाचे ठरत आहे.

डिजिटल बँकिंगचे फायदे -

डिजिटल बँकिंग द्वारे होणारे व्यवहार ही आधुनिक काळातील अत्यंत उपयुक्त आणि आवश्यक संकल्पना आहे. त्याचा सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, महिला, व्यावसायिक, शेतकरी या सर्वच वर्गाला फायदा झाला आहे. या डिजिटल बँकिंगचे होणारे फायदे पुढील प्रमाणे सांगता येतील.

1) वेळेची बचत होते –

डिजिटल बँकिंगचा वापर केल्यामुळे व्यवहार करण्यासाठी बँकेत जाऊन रांगेत उभे राहण्याची गरज भासत नाही. आपण असेल त्या ठिकाणावरून पैसे हस्तांतरित करून व्यवहार पूर्ण करता येतात. त्यामुळे वेळेची बचत होते.

ISSN
(Online) 2320 – 6446
(Print) 2320 – 8341

2) कधीही कोठूनही व्यवहार करता येतात –

इंटरनेटची सुविधा असेल तर आठवड्यातले सातही दिवस चोवीस तास (7x24) ही सेवा उपलब्ध असते. Net Banking, Mobile App, UPI या साधनांच्या आधारे ग्रामीण किंवा शहरी भागातून व्यवहार पूर्ण करता येतात.

3) सोयीस्कर व्यवहार –

डिजिटल व्यवहारामुळे बँकेत जाण्याची गरज नसते. संगणक, मोबाईल यांच्या साह्याने व्यवहार करता येत असल्यामुळे ही पद्धत सोयीस्कर मानली जाते.

4) सुरक्षितता आणि पारदर्शकता –

यातून होणारे व्यवहार हे सुरक्षित असतात. कारण डिजिटल व्यवहारांमध्ये पासवर्ड, ओटीपी, बायोमेट्रिक पद्धत वापरली जात असल्यामुळे ती सुरक्षित असते. क्यूआर कोड किंवा विविध ॲपवर पैसे पाठवले जातात त्यावेळी त्या व्यवहाराचा तपशील लगेच उपलब्ध होतो. त्यामुळे गैरव्यवहाराची शक्यता कमी राहते आणि व्यवहारात सुरक्षितता व पारदर्शकता निर्माण होते.

5) रोकड विरहित (कॅशलेस) व्यवहार –

डिजिटल बँकिंगच्या वापरामुळे रोख रक्कम स्वतः जवळ बाळगण्याची गरज भासत नाही. त्यामुळे प्रवासात, गर्दीच्या ठिकाणी पैसे हरवण्याची किंवा चोरीला जाण्याची शक्यता कमी असते. तसेच कॅशलेस व्यवहारामुळे खर्चावर नियंत्रण राहते.

6) सरकारी योजनांचा थेट लाभ मिळतो –

शेतकरी सन्मान योजना, विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्ती योजना, पेन्शन, महिलांसाठीच्या विविध योजना या योजनांची रक्कम थेट खात्यात जमा करणे डिजिटल व्यवहारामुळे शक्य झाले आहे. परिणामी मध्यस्थांची साखळी तुटली असून त्यातील भ्रष्टाचार कमी होत आहे.

7) बँकिंग व्यवहारात वाढ –

इंटरनेटच्या सुविधा ग्रामीण भागापर्यंत पोहोचल्यामुळे प्रत्येक व्यक्ती नेट बँकिंग किंवा मोबाईल बँकिंगचा वापर करत आहे. बँकेत खाते काढत असतानाच एटीएम कार्ड घेतले जाते. त्यामुळे ऑनलाइन पद्धतीने होणाऱ्या बँकिंग व्यवहारात वाढ होताना दिसते.

8) ऑनलाइन पद्धतीने खरेदी विक्री –

ISSN
(Online) 2320 – 6446
(Print) 2320 – 8341

अनेक बँकांनी ऑनलाइन व्यवहारासाठी त्यांचे स्वतःचे ॲप विकसित केलेले आहेत. त्या ॲपवरून घरबसल्या लाईट बिल, फोन बिल भरणे, बस, विमान किंवा सिनेमाची तिकिटे बुक करणे, विविध वस्तूंची ऑनलाइन पद्धतीने खरेदी करणे हे व्यवहार सोपे झाले आहेत.

9) पैशाचे जलद व्यवहार –

बँकेच्या परंपरागत कार्यपद्धतीमुळे पैशाचे व्यवहार होण्यासाठी काही दिवसांचा कालावधी जात होता. सध्या डिजिटल बँकिंगमुळे NEFT, RTGS, IMPS आणि UPI द्वारे जलद गतीने निधीचे हस्तांतरण करता येऊ लागले आहे.

10) खात्याचे व्यवस्थापन –

डिजिटल बँकिंगच्या वाढत्या वापरामुळे बँकेच्या शाखेत प्रत्यक्ष न जाता आपण आहोत त्या ठिकाणावरून आपल्या खात्यावर नियंत्रण ठेवू शकतो. बॅलन्स तपासणे, पासबुक किंवा आपल्या खात्यातील व्यवहार पाहणे, स्टेटमेंट मिळवणे, खात्यावर झालेले व्यवहार चेक करणे या सर्वाचे व्यवस्थापन बसल्या जागेवर करता येते.

डिजिटल बँकिंगच्या वापरात निर्माण होणारे धोके -

डिजिटल बँकिंगचे व्यवहार जेवढे सोयीचे झाले आहेत तेवढेच त्यात काही धोके देखील निर्माण झाले आहेत. प्रामुख्याने सायबर गुन्हेगार लोकांच्या तांत्रिक अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांची फसवणूक करतात. डिजिटल व्यवहार वाढल्यामुळे सायबर गुन्हेगारीचे प्रकारही वाढले आहेत. योग्य काळजी न घेतल्यास व्यक्तीला आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागते. डिजिटल बँकिंग मधील काही संभाव्य धोके -

1) फिशिंग –

यामध्ये बँक अधिकारी असल्याचे भासवून फोन केला जातो. त्यातून ओटीपी, पासवर्ड, कार्ड क्रमांक माहीत करून घेतला जातो. चुकीची लिंक पाठवून लॉगिनद्वारे माहिती मिळवली जाते. खोटे ई-मेल किंवा मेसेज पाठवून त्यातील लिंक वर क्लिक करायला सांगितले जाते व व्यक्तिगत माहिती मिळवली जाते.

2) फेक वेबसाईट किंवा बनावट ॲप –

अनेकदा मूळ बँकिंग ॲप सारखे दिसणारे बनावट ॲप तयार केले जातात. बँकेसारखी दिसणारी बनावट वेबसाईट तयार केली जाते व त्यावर माहिती भरण्यास सांगितले जाते. त्यामधून ग्राहकाचा डेटा चोरला जातो.

3) QR कोडची फसवणूक –

ISSN
(Online) 2320 – 6446
(Print) 2320 – 8341

QR कोड फसवणूक ही डिजिटल फसवणुकीतील सामान्य पद्धत बनली आहे. दुकानात, मॉलमध्ये किंवा ऑनलाईन पेमेंट करत असताना बनावट QR कोड स्कॅन केल्यामुळे खात्यातील पैसे चुकीच्या खात्यात जाऊ शकतात किंवा खाते हॅक होऊ शकते.

4) KYC अपडेट च्या नावाखाली फसवणूक –

'तुमचे KYC अपडेट नाही' असा मेसेज, कॉल येतो. त्यासोबत एखादी लिंक पाठवली जाते. या लिंकवर क्लिक केल्यास किंवा त्यावरील माहिती भरल्यास बँक खात्यामधून पैसे गायब होतात व आपली फसवणूक होते.

5) ATM कार्ड स्किमिंग –

ATM स्किमिंग म्हणजे एटीएम मशीनमध्ये लपवून ठेवलेले उपकरण वापरून कार्डची माहिती चोरी करणे. हे उपकरण कार्ड स्कॅन करताना कार्ड नंबर व पिन नंबर चोरते. त्यानंतर फसवणूक करणारे संबंधित व्यक्तीच्या खात्यातून पैसे काढून घेतात.

6) फेक गुंतवणूक योजनांद्वारे फसवणूक –

तुम्ही विशिष्ट क्षेत्रात गुंतवणूक केल्यास तुम्हाला जास्त परतावा मिळेल असे सांगून बनावट गुंतवणुकीच्या योजना राबवल्या जातात. कमी कालावधीत जास्त परतावा मिळवण्याच्या अपेक्षेने लोक अशा फेक गुंतवणूक योजनेमध्ये पैसे गुंतवतात. पैसे जमा केल्यावर मात्र कंपनी किंवा व्यक्ती गायब होते आणि आपली फसवणूक होते.

7) तात्काळ व ऑनलाईन कर्ज योजनेतून फसवणूक –

कमी व्याजदरात किंवा कोणतीही कागदपत्रे न देता झटपट कर्ज देण्याच्या नावाखाली बनावट ॲपद्वारे लोकांची फसवणूक केली जाते. लगेच कर्ज मिळेल म्हणून व्यक्ती या ॲप वरची माहिती भरतात आणि फ्रॉडमध्ये अडकतात.

8) असुरक्षित इंटरनेट द्वारे फसवणूक –

रेल्वे स्टेशन, बस स्टॅन्ड किंवा कॅफे यासारख्या सार्वजनिक ठिकाणी असणारे इंटरनेट वापरून बँकेशी संबंधित व्यवहार केल्यास हॅकर्स व्यक्तीची माहिती सहज हॅक करू शकतात आणि त्यातून फसवणूक होते.

ISSN
(Online) 2320 – 6446
(Print) 2320 – 8341

9) स्क्रीन शेअरिंग ॲप द्वारे फसवणूक –

फसवणूक करणारे आपणाला स्क्रीन शेअरिंग ॲप डाऊनलोड करायला सांगतात. असे ॲप डाऊनलोड केल्यास फसवणूक करणाऱ्या व्यक्ती आपल्या मोबाईलचा ताबा घेतात आणि मोबाईल मधील माहिती मिळवून आपले बँक खाते रिकामे करतात.

RBI च्या वार्षिक अहवालातून अशी माहिती समोर आली आहे की, देशात डिजिटल पेमेंट आणि डिजिटल बँकिंगमुळे फसवणुकीमध्ये वाढ झाली आहे. सन 2024-25 या आर्थिक वर्षात फसवणुकीमध्ये गमावलेली रक्कम 36,014 कोटी रुपये एवढी आहे. कर्जाशी संबंधित फसवणुकीत लोकांनी 33,148 कोटी रुपये गमावले आहेत. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये सर्वाधिक 25,667 कोटी रुपयांची फसवणूक झाली आहे. सध्या फसवणुकीच्या घटना कमी झाल्या असल्या तरी त्यात गमावलेली रक्कम मात्र तुलनेने जास्त आहे. अशी फसवणूक टाळण्यासाठी आरबीआयने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाचे पालन केले पाहिजे. तसेच कधीही ओटीपी, पासवर्ड, एटीएम पिन इतरांना देऊ नये. अनाधिकृत ॲप, वेबसाईट यांचा वापर टाळावा. अनोळखी लिक किंवा क्यूआर कोड स्कॅन करू नये. आपल्या खात्याची सतत तपासणी करावी. आपली फसवणूक होते आहे असे वाटत असल्यास बँक कॉल सेंटरवर लगेच संपर्क करावा आणि होणाऱ्या धोक्यापासून सावध राहावे. असे केल्यास डिजिटल बँकिंगचा वापर हा आर्थिक विकासाच्या मार्गातील सुवर्णकाळ बनू शकतो.

संदर्भ -

1) डॉ मुकुंद महाजन – भारतीय बँक प्रणाली, निराली प्रकाशन, पुणे.
2) डॉ सुनील उगले – बँक व्यवसायाची मुलतत्वे, निराली प्रकाशन, पुणे.
3) प्रा.आर जी आघाव – आधुनिक बँक व्यवसाय, अथर्व प्रकाशन, पुणे.
4) अविनाश कुलकर्णी – ई बँकिंग, मराठी विश्वकोश
5) The Economics Times – 30 May 2025.
6) https://www.mahamtb.com